# “महाराष्ट्रातील बंजारा समुदायाचा ऐतिहासिक अभ्यास”

## विशेषसंदर्भ - (लातूर जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयातील पदवीसाठी

सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

श्री अनिल प्रल्हाद राठोड

एम. ए. इतिहास

मार्गदर्शक

प्रा. डॉ. एम. डी. दामाजीवाले

प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक व समाजशास्त्र विभागप्रमुख,

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद,

ता. अहमदपूर जिल्हा. लातूर. ४१३५१४.

संशोधन केंद्र

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर, जि. नांदेड.

डिसेंबर २०२२

“महाराष्ट्रातील बंजारा समुदायाचा ऐतिहासिक अभ्यास” विशेषसंदर्भ - (लातूर जिल्हा)

## प्रस्तावना :

आपल्या देशातील समाजावर जातीपातीचा प्रभाव दिसून येतो. समाज व्यवस्था ही जातीवर अवलंबून आहे. काही समाज टोळी करून राहतात. व काही आदिवासी भटक्या लोकाचा समाज हा जंगलात डोंगर दऱ्या राहतो. भारतात अनेक लोक राहतात काही लोक दुःखी दरिद्री जीवन जगत असतात त्यांचा समाजावर वाईट परिणाम होतो समाज एक विविध जाती धर्मातून तयार झाला आहे.

इंग्रज सरकारने काही भटक्या टोळ्या करून राहणाऱ्या लोकांना गुन्हेगारी जमात म्हणून घोषित केले. इंग्रज सरकारने अनेक कायदे करून समाजावर अत्याचार सुरू केले होते. आपला देश स्वातंत्र्य झाल्यानंतर भटक्या विमुक्त समाजाचा विकास झालेला दिसून येतो. त्यांना मतदानाचा अधिकार मिळाला आहे. शासनाच्या काही योजनाचा लाभ कमी प्रमाणात मिळाला आहे.बंजारा समाज हा भटक्या विमुक्ता चा समाज आहे. बंजारा लोक मीठ अन्नधान्याचा व्यापार करत असत. गाय - बैल यांचा तांडा त्यांच्यासोबत असत गाई- बैला वरून मालाची ने आण करत बंजारा समाजातील लोक दळणवळण करून व्यापार करत बंजारा समाज हा राज्यात अनेक ठिकाणी राहत आहे. बंजारा समाजाचे मूळ स्थान अफगाणिस्तान आहे. मुगल बादशाह बाबरे यांच्या सैन्यात बंजारा होते.बंजारा समाज हा लढवय्या वृत्तीचा होता. बंजारा समाज देशात अनेक राज्यात विस्तारला आहे. त्यामध्ये राजस्थान, कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, आसाम, गुजरात ,मध्य प्रदेश, दिल्ली, आहे. बंजारा समाजावर इंग्रज सरकारने अनेक कर लादले होते. त्यामुळे बंजारा समाजाचे व्यवसाय नष्ट झाले. बंजारा लोकांवर अनेक कर लादले गेले होते. त्यातून त्यांचा व्यवसाय नष्ट झाला

होता. बंजारा समाज हा शेती ऊस तोडणी अनेक प्रकारे कामे करणारा समाज आहे. बंजारा लोकांचे सामाजिक आर्थिक शोषण झाले आहे. हा समाज मागास व दरिद्री आहे.

भारतीय समाज व्यवस्था जातीवर आधारित आहे. समाजावर जातीपातीचा प्रभाव दिसून येतो. मनु याने मनुस्मृती या ग्रंथामध्ये समाजावर जातीचा प्रभाव सांगितला आहे. समाजामध्ये वर्ण व्यवस्था अस्तित्वात आहे.या वर्ण व्यवस्थेमध्ये ब्राह्मण, क्षेत्रीय, वैश्य, शूद्र असे गट केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती या ग्रंथावर जोरदार टीका केली आहे.बंजारा समाजाची वेगळी संस्कृती आहे. भाषा वेगळी आहे. बंजारा समाजातील वेशभूषा वेगळ्या प्रकारची आहे. समाजात बंजारा समाज वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. बंजारा समाजाची बोलीभाषा, वेशभूषा, राहणीमान वेगळ्या प्रकारचे आहे. बंजारा समाज महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी राहतो. समाजाच्या आर्थिक व सामाजिक, संस्कृती बदल आवश्यक आहे. बंजारा समाज वेगवेगळ्या तांडा च्या स्वरूपात विभागलेला आहे. महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाचा ऐतिहासिक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

## विषय निवड :

बंजारा समाजाची सामाजिक, संस्कृतिक, आर्थिक जीवन जगण्याची पद्धत वेगळी आहे. बोलीभाषा, वेशभूषा, संस्कृती यातून बंजारा समाजाचे वेगळेपण दिसून येते. समाजात बंजारा समाजाचे योगदान मोठी आहे. बंजारा समाज आपल्या बोलीतून, संस्कृतीतून, वेशभूषा स्वातंत्र्य विचार व्यक्त करते. बंजारा समाज हा मेहनती व कष्टाळू आहे. समाजाचे अनेक पैलू विषयी ऐतिहासिक लेखन आवश्यक आहे. बंजारा समाजाच्या सुधारण्यासाठी शासनाच्या विविध योजना ची माहिती आवश्यक आहे. बंजारा समाज लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आहे. रेणापुर, उदगीर, औसा, निलंगा, देवणी, अहमदपुर या

भागात बंजारा समाज आढळतो. या भागातील समाजाच्या सामाजिक, संस्कृती परिस्थितीवर संशोधन होणे आवश्यक आहे. समाजात अनेक रूढी परंपरा याची माहिती करून जागृती व प्रगती करण्यासाठी संशोधन आवश्यक आहे. बंजारा समाज हा शेती, ऊस तोडणी करणारा समाज आहे. बंजारा समाज हा मागास व दरिद्री समाज आहे. या समाजाचे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक नुकसान झाले आहे . समाजाचे भविष्य चांगले व्हावे व समाजातील अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. बंजारा समाजाचे भविष्य सुधारावे यासाठी योग्य प्रकारे काम करणे आवश्यक आहे. मी स्वतः बंजारा समाजातील असून मी बंजारा समाजाची ऐतिहासिक वाटचाल जाणून घेण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

## संबंधित साहित्याचे पुनरावलोकन :

महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेत अनेक जाती जमाती असलेला समाज आहे. समाज निर्माण करण्यासाठी अनेक जाती जमातीचे मोठे योगदान आहे बंजारा समाजात काही लेखन झाले आहे. बंजारा समाजात थोड्या प्रमाणावर लेखन झाले आहे. लेखनामध्ये गोरबंजारा आत्माराम राठोड .बंजारा समाज डॉ. प्रमोद पवार, गोर बंजारे लोकांचा इतिहास बळीराम पाटील हे ग्रंथ लिहिले आहेत. समाजातील रूढी, परंपरा, सण-उत्सव माहिती या वेगवेगळ्या ग्रंथातून मिळते. बंजारा समाज स्वातंत्र्या नंतर काही प्रमाणात बदल झाला आहे. बंजारा समाजातील प्राचीन माहिती व संशोधन आवश्यक आहे .बंजारा समाजातील ग्रंथ लेखन आवश्यक आहे. ग्रंथातून सखोल माहिती मिळते. समाजाच्या सुधारण्यासाठी मार्गदर्शन मिळते. स्वातंत्र्यानंतर बंजारा समाजात झालेल्या परिवर्तना विषयी माहिती मिळते. बंजारा समाजाची सखोल माहिती मिळवण्यासाठी ग्रंथ आवश्यक आहे. त्यातून समाजावर विशिष्ट प्रकारचा प्रभाव पडतो.

## संशोधनाची उद्‍दिष्टे :

1. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाची सामाजिक, संस्कृतिक माहिती अभ्यासणे.

2. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजातील रूढी, परंपरा, सण रितीरिवाज अभ्यासणे.

3. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाची सध्याची सामाजिक, आर्थिक परिस्थिती अभ्यासणे.

4. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाचे परिवर्तन अभ्यासणे.

5. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाचे स्वतःची ओळख निर्माण केली आहे ती अभ्यासणे.

6. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाची सखोल माहिती अभ्यासणे.

## ग्रहीतके :

1. लातूर जिल्ह्यात अनेक जमाती आहेत.

2. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजातील तांड्याचा विकास होत आहे.

3. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजामध्ये सामाजिक, संस्कृती क्षेत्रामध्ये मोठे योगदान आहे.

4. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाज शिक्षणामध्ये प्रगत होत आहे.

5. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाज काळानुसार बदलत आहे.

6. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाज आधुनिक होत आहे.

7. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाची व्याप्ती मोठी आहे.

8. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाज सर्व क्षेत्रात प्रगत झाला आहे.

## संशोधनाची मर्यादा व व्याप्ती :

बंजारा समाज हा भारतातील अनेक राज्यात विखुरलेला आहे. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाचा ऐतिहासिक अभ्यास या संशोधन विषयातून लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाबाबत संशोधन मांडले जाणार आहे. आवश्यक ठिकाणी भेटी देऊन माहिती संकलित केली जाणार आहे. बंजारा जमाती बाबत शासनाची अहवाल आवश्यक तेथे आधार घेतला जाणार आहे. आधुनिक पद्धतीने उपलब्ध माहितीचा वापर केला जाणार आहे. संशोधनात लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाची सामाजिक, सांस्कृतिक स्थिती एक मर्यादा आहे. बंजारा समाजाची व्याप्ती मोठी आहे. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाची सामाजिक, संस्कृतिक स्थितीचे संदर्भात जे निष्कर्ष प्राप्त होतील. जिल्ह्यातील ज्या तालुक्याची गावाची व तांड्याची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे. गाव व तांड्याची माहिती मुलाखतीच्या आधारे प्राप्त केली आहे.

## संशोधन पद्धती :

संशोधनासाठी जो विषय निवडला आहे. त्याचे योग्य संशोधन पद्धतीने केले जाणार आहे. संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर केला जाणार आहे. संशोधनासाठी वस्तुनिष्ठपणे मांडणी केली जाणार आहे. आवश्यक तेथे भेटी दिल्या जाणार आहेत. मुलाखत व सर्वेक्षक पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. संशोधन ऐतिहासिक पद्धतीवर आधारलेली आहे. संशोधनासाठी प्रकाशित व अप्रकाशित साधनाचा वापर केला जाणार आहे. ज्या साधनाचे परीक्षण करून त्यांचा पुरावा म्हणून स्वीकार केला जाणार आहे.

**प्रकरण नियोजन.**

**“महाराष्ट्रातील बंजारा समुदायाचा ऐतिहासिक अभ्यास.”**

**(विशेष संदर्भ-लातुर जिल्हा )**

**प्रकरण पहिले**

**1महाराष्ट्रातील बंजारा समुदायाचा ऐतिहासिक पार्श्वभूमी.**

या प्रकरणात महाराष्ट्र जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी भौगोलिक स्थान ,व क्षेत्रफळ, भूमी, हवामान, वनसंपदा, लोकसंख्या, नद्या, जलसिंचन, उद्योग, इत्यादीवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**प्रकरण दुसरे**

**2 लातुर जिल्हातील बंजारा समुदायाचा इतिहास**

या प्रकरणात लातूर मधील बंजारा समुदायाचा इतिहास बंजारा समाजाचा वेशभूषा, अलंकार, बोलीभाषा, आहार, गोंदन, बंजारा समाजाचे मूळ वस्ती स्थान, वंशावळी, बंजारा समाजाचा तांडा ओळख.

**प्रकरण तिसरे**

**3. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाची सामाजिक परिस्थिती.**

या प्रकरणात लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाचा सामाजिक जीवन शैलीवर प्रकाश टाकण्यात येणार आहे

**प्रकरण चोथे**

## 4 . लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाची धार्मिक परिस्थिती.

या प्रकरणात लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाचा धार्मिक परिस्थितीवर प्रकाश टाकने. बंजारा समाजाचा धर्म हा हिंदू आहे. अनेक रूढी परंपरा यातून धर्म तयार झाला आहे. बंजारा समाजात धर्मामध्ये वेगवेगळे सण-उत्सव दिसून येतात.

**प्रकरण पाचवे**

## 5 . लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाची सांस्कृतिक परिस्थिती.

या प्रकरणात लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाची संस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करणे. बंजारा समाजाचे वेगवेगळे सण-उत्सव, परंपरा अभ्यास करणे. बंजारा संस्कृतीवर संशोधन करणे.

**प्रकरण सहावे**

## 6. लातूर जिल्ह्यातील शासनाच्या विविध योजना.

या प्रकरणात बंजारा समाजासाठी शासनाने राबवलेल्या विविध योजना व लातूर जिल्ह्यातील बंजारा कुटुंबाना मिळालेले लाभ यांचा अभ्यास करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील बंजारा समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे 1871 चा कायदा बंजारा समाजाला गुन्हेगारी जमात करण्यात आले होते. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर कायदा नष्ट झाला आहे. या कायद्यामुळे बंजारा समाजाला गुन्हेगारी जमात करण्यात आले होते. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर कायदा नष्ट झाला आहे. या कायद्यामुळे बंजारा समाजावर अनेक प्रकारे अन्याय झाला आहे. बंजारा समाज आरक्षण, शिक्षण, योजना यापासून वंचित आहे. लातूर जिल्ह्यातील बंजारा समाज त्यांना मिळालेले लाभ, विविध योजना यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**निष्कर्ष.**

या प्रकरणांमध्ये अभ्यास विषयाचा सारांश, निष्कर्ष, अनुषंगाने बंजारा समाजाच्या जातीसाठी धोरणात्मक उपाय सुचविण्यात आले आहेत. प्रस्तुत शोध प्रबंधात आवश्यकतेप्रमाणे प्रकरणे कमी-जास्त होतील.

## संदर्भ साधने.


1. प्राथमिक साधने.

1. महाराष्ट्रातील आर्थिक पाहणी अहवाल.

2. अर्थ व सांख्यिकी संचलनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन मुंबई 2013.

3. शासन राजपत्र महाराष्ट्र विधानसभा मुंबई 2013

4. पी. बी. पाटील समिती महाराष्ट्र शासन यातील ग्रामीण विकास पंचायत राज मूल्यमापन समिती अहवाल 1986.

5. महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही वसंतराव नाईक कालखंड 1966.

6. नाईक वि. पी. कमिटी ऑफ डिसेंत्रलिझेशन गव्हर्मेंट महाराष्ट्र 1960.

7. लातूर जिल्हा गॅझेट.


## दुय्यम साधने.


1. गोर बंजारे लोकांचा इतिहास बळीराम पाटील प्रकाशक गोरबंजारा प्रकाशन कळमेश्वर 24 डिसेंबर 2017.

2. बंजारा समाज राजकीय आणि सामाजिक सहभाग डॉ. प्रमोद मनोहर पवार प्रकाशक युवराज भटू माळी 20 फेब्रुवारी 2015.

3. गोरबंजारा समाजाची ओळख. राठोड. ग. ह. राजगुरू प्रकाशन कचनेर औरंगाबाद 2008.

4. बंजारा जाती समाज मराठी और संस्कृती. डॉ. जाधव यशवंत वाणी प्रकाशन नवी दिल्ली.

5. बंजारा समाज. शर्मा श्रीराम. दक्षिण प्रकाशन हैदराबाद 1981.

6. भटक्या विमुक्तांची जात पंचायत. रामनाथ चव्हाण. प्रकाशक देशमुख आणि कंपनी पुणे 5 मार्च 2002.

## वृत्तपत्रे.

1. दैनिक लोकमत औरंगाबाद.

2. दैनिक संचार सोलापूर.

3. दैनिक लोकसत्ता पुणे.

4. दैनिक महाराष्ट्र टाइम्स मुंबई.

5. दैनिक सकाळ पुणे.

6. दैनिक सत्यवादी कोल्हापूर.

## मासिके.

1. राठोड आत्माराम गोर वाणी मासिक गोर वाट ऑफ सेंट औरंगाबाद 2009.

2. दिगंबर राठोड बंजारा एकता मासिक 2001.

3. राठोड माणिक जागो बंजारा एकता मासिक 2001.

**संशोधक विद्यार्थी**

श्री अनिल प्रल्हाद राठोड

**मार्गदर्शक**

डॉ. एम. डी. दामाजीवाले

प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक व समाजशास्त्र विभागप्रमुख,

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद,

ता. अहमदपूर जिल्हा. लातूर- ४१३५१४.